# विरहवेदना अर्थात साक्ष मावळत्या सूर्याची

-- चं.प्र.देशपांडे

(सुधा वळून पाहते. तिच्या डोळ्यांत अश्रू ...)

समीरः म्हणजे तुझ्या डोळ्यांतल्या या अश्रूंपर्यंत ओघळत आले क्षण...लटांबर नको म्हणता म्हणता मावळत्या सूर्याची साक्ष काढायची वेळ आली...

सुधाः आणि हा क्षण तरी लांबून लांबून किती लांबणार आहे ? कोणतेच पत्ते समाधानकारक वाटू नयेत आणि हा तर शेवटचा डाव असावा आणि मनाच्या सगळ्या धडपडीला निरर्थकपणा यावा आणि तरीही थांबता येऊ नये आणि तरीही थांबल्यासारखं वाटावं आणि थांबणं संपण्याची भीती वाटावी... का घडतं हे सगळं ? कशासाठी वाजतात हे बहिरे टोल ?

समीरः आठवणींच्या हजार चिंध्यांची ओझी साठवली आपण...उडता उडता थांबलेल्या... अचानक जमिनीवर निपचित पडलेल्या...युध्दांचे परिणाम कधी कळणार ? माझ्या तर मनाला एक गतिमान ग्लानी आली आहे... मी आता कुठेही गेलो तरी परका वाटत राहीन...

सुधाः माझ्याही पाठीचा कणा याच ओझ्यांची मोजदाद करतोय... पण समीर...माझ्या समीरा, ही ओझी नसती तर काहीच कळलं नसतं आपल्याला...एखाद्या मृत अंधारात पडून राहिलो असतो आपण...विचारहीन...संवेदनाहीन...दुःखहीन...

समीरः आणि आपण तर कळण्याचं महत्त्व जोपासत आलो...ओझी कळली पाहिजेत...दुःख कळलं पाहिजे...

सुधाः असाही क्षण दुःखी न होता जगता येईल का ? कळलं तर पाहिजे पण दुःख नको, भीती नको, वेदना नको...

समीरः अथांग पसरलेले हे तेजोहीन चेहरे काय सांगतात ? काय सांगते ही निखळलेल्या डोळ्यांची परंपरागत माळ ? काय सांगतात हे थांबणाऱ्या पावसाचे थकलेले ऋतू ?... तू थकलीयस सुधा...तुला विश्रांती हवीय...विचारांनी नवेनवे कोंब फुटत जातील हिंसक या थकव्याला आणि एखाद्या ज्वालाग्राही शहराप्रमाणे होत राहशील तू निर्मनुष्य.... कुणाचाच काही इलाज नसलेली एखादी घटना...खरं तर येणारच होता हा प्रसंग...याची वाटच पाहात होतो आपण...आपल्यातच होतं हे सगळं...फक्त काळाबरोबर आपली शरीरं इथपर्यंत यायची होती...जणू आपल्या शरीरांचीच ही वाढ होती...म्हणून म्हणतो, तू शांत हो...आपल्याला ही वाढ रोखता आलीच नसती...कारण रोखायचा प्रयत्न करणाऱ्या शरीरांचाच तर प्रश्न होता...

सुधाः ( काही क्षण स्तब्ध उभी राहते. मग चेहऱ्यावर किंचित स्मित...) माझी काळजी वाटतीय तुला ? या शेवटच्या क्षणी ? आणि या क्षणानंतर काय करशील ? तुझ्या विचारांचे हात माझ्या अवतीभवती भिरभिरत सावरत राहतील का मला ?

समीरः या शेवटच्या क्षणी विरहवेदनांची सुरुवात करण्यापेक्षा मीलनाच्या पूर्णत्वात विलीन होऊ शकलो असतो आपण तर किती बरं झालं असतं. हा शेवटचा क्षण आहे हे आपल्याला माहीत असायला नको होतं.

सुधाः म्हणजे काय झालं असतं ? फसलो असतो आपण. निरोप देताघेता आले नसते आणि मुख्य म्हणजे आयुष्यभर पुरणारी वेदनेची ही जडशीळ गाठ बांधून घेता नसती आली मनात...

समीरः हं...( सुस्कारतो. बसतो.) खरं आहे... यानंतरचा प्रत्येक क्षण आपल्याला वेदनेत तडफडत घालवता येईल... दुःखभारानं आपले डोळे सतत आंधळे ठेवता येतील...सगळ्या संवेदना क्षणक्षणानं जळताना अनुभवता येतील...आणि आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला या कडूझार विषाचा अनुभव देता येईल... म्हणजे आपली व्यक्तित्वं खोटी ठरणार नाहीत...आपण जे जगलो ते खरं होतं हे सिध्द होत राहील...आपण एकमेकांवर प्रेम केलं होतं ही गोष्ट अमर होत राहील...

सुधाः म्हणजे हा आपल्या प्रेमाच्या अमरत्वाचाही क्षण आहे आणि आपल्या आत्महत्यांचाही क्षण आहे... मी आता पुन्हा प्रेम करू शकणार नाही... माझं सर्वस्व मी तुला देऊन टाकलेलं आहे...आता तू माझ्या आयुष्यात नसलास तरी मी तुझ्यावर प्रेम करत राहीन... तू समोर नसलास तरी दिसत राहशील मला... ज्या क्षणी यात खंड पडेल त्या क्षणी मृत्यू झालेला असेल माझा...

समीरः नाही, नाही...नाही... फक्त आजच...एकदाच आपला मृत्यू होईल...पुन्हा कधीच नाही...एककेटयानं मरायचा हक्क कुठं शिल्लक ठेवलाय आपण एकमेकांना ...? सुधा !...

सुधाः अं --

समीरः जवळ ये... मला तुला शेवटचा स्पर्श करायचा आहे... आता पुन्हा हे घडू शकणार नाही...( ती येते. बसते. तो तिचा हात हातात घेतो.) कधीकाळी आपण एकत्र हसलो होतो..

सुधाः पण मी हे सगळं सहन करत जिवंत राहीन...हे सहन करताना तू असाच जवळ आहेस असं मला जाणवत राहील...

समीरः म्हणजे आपण एकमेकांना बांधले गेलेलो आहोत..आता समाजाचे न्यायअन्याय आपल्यापर्यंत पोचू शकणार नाहीत...कोणतीच माणसं नसतील आपले सगेसोयरे, मित्र आणि शेजारी...सगळे समूह जिरून जातील या अतूट बंधनाच्या असीम वाळवंटात...

सुधाः माझे डोळे कोरडे पडलेत की माझ्या घशाला कोरड पडलीय हेच कळत नाहीय...

समीरः आणि मला तर लहानपणी माझ्या जवळून नाग गेला होता ते आठवतंय...पण चावला नव्हता...अजूनही मला ते का आठवावं ? ती भीती का आठवावी ? मी जगत राहतो आणि माझ्या काळाचा विस्तार होत राहतो. यापुढे माझ्या काळाचा विस्तार होणारच नाही बहुतेक...आणि असा मी जगत राहीन...

सुधाः इतकं बोलायचं आहे की शब्द आटतायत आणि असं वाटतंय की गप्प बसून जितकं कळेल तितकं बोलून कळणार नाही.

समीरः आपण अशा अशा आईबापांच्या पोटी जन्मलो म्हणून असे असे झालो...आणि आपण सापडणार होतोच एकमेकांना...आणि सापडल्यावर मग शेवटी हे घडणार होतं...हेच घडणार होतं...हेच घडेल...अजूनही दुसरं काही घडवता येईल आपल्याला, पण आपण घडवणार नाही...घडवूच शकणार नाही...कारण आपल्या शक्यतांना मर्यादा आहेत आणि म्हणूनच त्या निश्चित आहेत. मर्यादा नसलेला असा एखादा क्षण असू शकेल कुणाच्या आयुष्यात ? शक्य नाही.

सुधाः आणि म्हणूनच उघडे पलिते, उघड्या डोळ्यांनी पाहात दूर दूर जाणार आहोत आपण...आपण कोणतीही हालचाल केली नाही तरी...

समीरः कुठून बोलतेयस तू सुधा ?

सुधाः या ठिकाणाचं नाव मला माहीत नाही... पण खूप त्रास होतोय...गळ्याला...

समीरः तू बोलताना तुझ्या गळ्याचे कोणते स्नायू हलतायत, कोणत्या नसा ताण घेतायत यावर लक्ष ठेव --

सुधाः माझा गळा कशाततरी अडकलाय.

समीरः म्हणजे हा प्रसंग माझ्या जिवावर बेतणार ! सोडवायचा प्रयत्न कर...अजून संधी आहे.

सुधाः सोडवायला गेलं की रक्त येतंय.

समीर : मग थांब, थांब. घाईनं काहीही करू नकोस.

सुधा : थांबलं की लक्ष ठेवता येत नाहीय.

समीरः मग जाऊ दे --- लक्ष ठेवायची काही गरज नाही. अनुभव येत राहतोय तसा येऊ दे --- अनुभवाचं दुःख सहन करणं परवडेल त्यापेक्षा --

सुधाः म्हणजे हिंसा होऊ द्यायची नाही हे आपले स्वभाव असणं हाच दोष आहे -- हे निश्चित ठरवल्यामुळंच आपल्याला दुःख भोगावं लागतंय --

समीरः निर्णय बदलणं जर आपल्या हातात असतं तर मुळातच आपण वेगळेच निर्णय नसतो का घेऊ शकलो ?

सुधाः म्हणजे आता तू हतबल व्हायचं ठरवलंयस. प्रयत्न थांबवायचेत तुला.

समीरः अपयशाचे नगारे सरळ सरळ ऐकू येतायत -- आणि हे नाकारण्यात काय अर्थ आहे ?

सुधाः अपयशाशी युध्द करू या आपण !

समीरः अपयशानं खचून जायचं असतं.

सुधाः अपयश ही यशाची पहिली पायरी नसते ?

समीरः अपयशानंतरही यशासाठी प्रयत्न चालू राहिले तर !

सुधाः परिस्थिती तीच राहात नाही-- बदलत असते. त्यामुळं, यशाची शक्यता लोप कशी पावेल ?

समीरः अपयशाचा धक्का सहन केलेली मनंही बदलण्याची शक्यता असते. कदाचित पूर्वीचा उत्साह आणि जोम आता राहणार नाही.

सुधाः आपल्याला जिद्दीनं जगायचं ठरवता येईल.

समीरः पहिल्या झटक्यात मिळालेलं यश शक्ती वाढवणारं असतं.

सुधाः तरीही जिद्दीनं जगता नाही येणार ?

समीरः त्यासाठी आपण कुठून बोलतोय ते माहीत असावं लागतं. आपला गळा कशात अडकलाय हे पाहता यावं लागतं. रक्त थांबवायचा प्रयत्न करायची इच्छा लागते. आणि धीरानं एकेक प्रश्न अलग करता यावा लागतो. आणि मुख्य म्हणजे जिवंत राहता यावं लागतं.

सुधाः जिवंत राहू या आपण !

समीरः जिवंत राहू या !( हसतो. ) मी तर मृत्यूचे प्याले घेऊन आलोय ! आपल्यासाठी ! यापुढचं आपलं आयुष्य म्हणजे जहर असणार आहे. आपण तडफडत राहू आणि आपल्या संपर्कात येणाऱ्या सगळ्या व्यक्ती या जहरानं विध्द होत राहतील... हा असा नाश करायचा आपल्याला काय हक्क आहे ? दुसरी कुठलीतरी हिंसा टाळण्यासाठी आपण अपयश का पत्करतोय ? आपल्या वागण्याला संगती राहिली पाहिजे.

सुधाः कशी राहील संगती ? एकत्र जगण्याच्या इच्छेसाठी एकत्र मरणार आहोत आपण. हिंसा टाळण्याच्या प्रयत्नातच हिंसाच करणार आहोत. सनसनाटी आणि उथळ उत्तरं नकोत म्हणून आपण पाताळयंत्री पलायन करणार आहोत.

समीरः विरहाचे वेध लागलेल्या प्रेमिकांना काय करायचीय संगती ? संगतीची काही गरज नाही. विरहवेदनांचे भक्ष्य ठरलेल्या कित्येकांच्या कहाण्या अमर झालेल्या आहेत. त्यांच्यात कोणती संगती होती ? फक्त हालअपेष्टांची --

सुधाः जेवढे हाल जास्त तेवढी कहाणी जास्त उठावदार आणि जास्त अमर होते. पण शेवटी मीलन घडलं तरच हं !

समीरः पण हल्ली फारशा कहाण्या अमर होत नाहीत कारण अमर होण्याची तीच तीच पध्दत पुन्हा पुन्हा अमर होऊ शकत नाही.

सुधाः असलं सारखं अमर करत बसायचा लोकांना कंटाळा येत असेल. त्यांनी अमर नाही केलं तर करणार कोण मग अमर ?

समीरः पण अमर न होताही एकमेकांच्या आकर्षणाला अर्थ असेलच या विश्वात. अमरच कशाला व्हायला
. पाहिजे ? समजा आपली कहाणी अमर नाही झाली तर आपण वेदना भोगल्या हे थोडंच खोटं ठरेल?

सुधाः आपण वेदना भोगल्या हे फारसं कुणाला माहीतच असणार नाही --त्यामुळं खऱ्याखोट्याचा प्रश्नच येणार नाही.

समीरः आपल्या वेदनांची सत्यासत्यता लोकांच्या मनांत शोधावी लागणं ही घाणेरडी पध्दत आहे.

सुधाः मलाही तसंच वाटतं -- पण न जाणो आपण अमर होणार नाही याच्या भीतीमुळं आपल्याला तसं वाटत असेल.

समीरः आपणच, आपलीच विधानं संशयास्पद करायची काय गरज आहे ? अशामुळं आपले आत्मविश्वास डळमळीत होत राहतात.

सुधाः त्यापेक्षा आपलं जे काही आहे ते खरं धरून चालावं. आपलं शरीर, आपलं मन, आपली वेदना -- खरं धरून चालावं. आणि खरं धरायचा तरी काय प्रश्न आहे ? वेदना जाणवतेच आपल्याला ! एखाद्या नको असलेल्या अटळ परिस्थितीत सापडल्यावर आपण असे वेदनामय निपचित होतो की याच्या खरेपणाचा संशय येणंच शक्य नाही.

समीरः वेदनेमुळं निश्चितच माणसाला खरेपणा मिळतो.

सुधाः आणि या खरेपणासाठी वेदना भोगावी लागते.

समीरः चमत्कार म्हणजे कसा घडू शकेल ? अचानक कुणीतरी येईल आणि सांगेल की परिस्थिती बदललेली आहे. आपण म्हणू, असं? आम्ही तर मृत्यूपंथाला लागणार होतो- काही क्षणातच. तो म्हणेल, छे छे !आता त्याची गरज नाही. परिस्थितीतले महत्त्वाचे घटक वेगळे झाले आहेत.

सुधाः म्हणजे आपल्या वेदनेचं कारण परिस्थितीत आहे. मला वाटत होतं की आपणच या वेदनेपर्यंत आलो आहोत. बाहेरच्या परिस्थितीनं खरं तर आपल्या स्नायूंवर ताण आणला आहे आणि तो ताणच तर वेदनामय आहे. परिस्थिती बदलली तर ताण जाईल, वेदना जाईल, सगळं मोकळं होईल आपोआप. स्वतंत्र. स्वच्छंद.

समीरः पण एखाद्या विशिष्ट परिस्थितीचा आपल्यावर किती परिणाम व्हावा हे तर आपल्यावर अवलंबून
. असेल ! ? की आपलं स्वातंत्र्य म्हणजेही खऱ्या अर्थानं परिस्थितीची गुलामगिरीच असते ? आपला

स्वतःचा सहभाग तरी काय असतो आपल्या जगण्यात ?

सुधाः मला तर वाटतंय की आपण फक्त एक तपशील आहोत एकूण परिस्थितीचा.परिस्थितीच फक्त जगत असते.

समीरः परिस्थिती घडतं कशी असेल पण ? आणि बदलत कशी असेल ?

सुधाः परिस्थितीच्या अंतर्गत काहीतरी कार्यकारण रचना असलेच. त्याप्रमाणे घडत असेल सगळं.

समीरः आणि या सगळ्याचा एक भाग म्हणून आपण वेदना भोगतो ?

सुधाः हो, फक्त एक भाग.

समीरः क्रूर वाटतं मला हे सगळं. हिंसक वाटतं. विकृत वाटतं. आपली प्रत्येक कृती ही एकूण परिस्थितीच्या कार्यकारण रचनेचा भाग असणार आहे हे असह्य आहे. यातून बाहेर पडायचा मार्ग कुठंतरी असेल. तो शोधायला पाहिजे आपण.

सुधाः आपल्याला वेळ तरी कुठं आहे आता ? हे सगळं करायला ?

समीरः आपल्याला वेळ नाही, आपली मनं अधू झालेली आहेत, आपल्याला काही सुचत नाहीय.

सुधाः पण मला एखादं दुःखमय गाणं म्हणता येईल अजून --

समीरः दुःख व्यक्त करणारं गाणं ! काहीही व्यक्त करत गेलं की गडद होत जातं, अधिकाधिक तीव्र होत जातं. आपणच आपली वेदना वाढवत राह्यचं !

सुधाः नुसतं वेदनेत राहात जाण्याचाही तोच परिणाम होतो. वेदनेतून मुक्त होण्याचा मार्ग नसेल तर ती वाढत राहणारच !

समीरः मग म्हण गाणं -- सहानुभूतीची भीक मागण्यासाठी -- कुणालातरी दया येऊन त्यानं आपल्याला यातनं सोडवायचा प्रयत्न करावा या इच्छेनं किंवा आपलं दुःखच किती उदात्त - भव्य आहे असं आपल्याला आणि दुसऱ्यांना वाटण्यासाठी !

सुधाः वेदनेत राहणं हेच जर मुळात मर्यादित आहे, तर मग या आणखी इतर मर्यादांची नक्षी काढत बसलं तरी कुठं बिघडतंय ? तेवढाच विरंगुळ्यात वेळ तरी जात राहील --

समीरः म्हणजे आपल्याला भरपूर वेळ आहे आणि तो फक्त घालवायचाच प्रश्न आहे.

सुधाः सगळं ताणरहित, नॉर्मल, मजेदार असताना करत होतास तशी चेष्टा करायची ही वेळ आहे का ?

समीरः मला सांगता नाही येणार. या उपलब्ध वेळात नेमकं काय केलं पाहिजे म्हणजे आपण या वेळात बरोबर तेच केलं असं कायम आपल्याला वाटत राहील ? वागण्याच्या, कृती करण्याच्या कोणकोणत्या शक्यता आहेत यांचा आधी विचार करून, त्यातली निवड करून मग वागता येईल का ? पण या अशा विचारात वेळ फुकट नाही जाणार ? आणि सगळ्या शक्यता लक्षात घेऊन निवड करता येईल ? आणि ती निवड बरोबरच असेल ?

सुधाः म्हणजे तुला आता सगळंच अर्धवट, चुकीचं आणि संशयास्पद वाटतंय.

समीरः मग तुला सांगता येईल एका क्षणात की यापुढचे दहा क्षण आपण नेमकं काय करावं ते ? मला तर वाटतं, ही आपली शेवटची भेट वायाच जाणार.

सुधाः मी तुला का आवडते ते सविस्तर सांगत रहा.

समीरः किंवा तू माझी समजूत घातलीस तर ? किंवा मी तुझी ?

सुधाः नाहीतर आपल्या त्या प्रदीर्घ चुंबनाचा अनुभव आठवत राह्यचं का ?

समीरः मला वाटतं आपण नुसतं बघत राहू एकमेकांच्या डोळ्यांत -- काहीच न बोलता.

सुधाः आपले डोळे गढूळ झालेत. ते नाही जमणार.

समीरः मग ?

सुधाः थांब न, सुचेल काहीतरी !

समीरः लौकर सुचलं नाही तर अधीरपणा वाढतो माझा.

सुधाः थांब न, सुचेल !

समीरः नाहीतर झटकन विष पिऊन टाकू आपण !

सुधाः नाही. पूर्ण जगणार आहोत आपण - एकत्र - विरहात का असेना --

समीरः किंवा हे संकटच घालवण्याची काही शक्यता आहे का याचा विचार केला तर ?

सुधाः मग त्यापेक्षा असं का नाही म्हणत की तू कुणीतरी वेगळाच आहेस, मीही कुणीतरी वेगळीच आहे --

अशी कल्पना करून आपलं आयुष्य कसं झालं असतं याचा विचार करायचा ! मग असे दुसरे खूप आहेतच की जगात ! ते आपण कसे होणार !?

समीरः मग माझ्या सुचवण्याच्या शक्यता संपलेल्या आहेत.

सुधाः माझ्याही -- बहुतेक --

समीरः किंवा आपण थकलो आहोत म्हणून सध्या कदाचित काही सुचणारही नाही --

सुधाः पण सुचलं तर आत्ताच सुचायला हवंय --

समीरः आत्ता आपण आपल्या पूर्ण शक्तीच्या स्थितीत नाही आहोत.

सुधाः आत्ता आपली मनःस्थिती वेगळी हवी होती.

समीरः म्हणजे वेगळं महत्त्वाचं काहीतरी सुचलं असतं.

सुधाः नुसतीच अस्वस्थता असह्य वाढतीय !

समीरः माझ्या मानेला ताण येतोय !

सुधाः माझी आई बेशुध्द पडली होती काल --

समीरः राजीनामा द्यायचं रद्द करतो मी --

सुधाः ए, हा डाग कसला पडलाय तुझ्या शर्टावर ?

समीरः मी मजेत आहे.

सुधाः काय म्हणालास ? तू मजेत आहेस ?

समीरः हो. असंच म्हणालो मी. आयुष्यात कुठंकुठं कधीकधी उच्चारलेलं वाक्य बोलून गेलो मी -- त्याच्या अर्थाशिवाय.

सुधाः त्यामुळं क्षणभर मलाही मजेत असल्यासारखी शंका चाटून गेली मनाला. खरंच आपण मजेत असतो या वेळी तर किती भयानक विकृत झालं असतं ते !

समीरः मला असं वाटतंय की भयंकर अस्वस्थतेमुळंच आपण बरोबर वागू शकत नाहीय. मन आणि शरीर स्वस्थ व्हायला हवंय. शांत व्हायला हवंय. अस्वस्थतेमुळं काहीच कळत नाहीय आपल्याला.

सुधाः पण मला तर वाटतंय की अस्वस्थतेची परमावधी गाठली पाहिजे आपण--आपल्या शरीराला -- मनाला-- झेपणार नाही इतकी-- उद्ध्वस्त झालं पाहिजे -- वेडं झालं पाहिजे -- तेच बरोबर होईल या स्थितीत --

समीरः म्हणजे मग आपल्याला काहीच कळणार नाही -- आपली ही शेवटची भेट आहे हेही आपण विसरून जाऊ-- आपण हा वेळ कसा घालवला याला काहीच महत्त्व राहणार नाही-- मला तसं व्हायला नकोय --

सुधाः आणि मला तसंच व्हायला हवंय -- तेच बरोबर होईल --

समीरः यावेळी आपल्यात मतभेद व्हावा हे दुर्दैव आहे --

सुधाः एकमत होणं आणि मतभेद होणं -- वेगवेगळं वाटतंय तुला ? एकमत झालं म्हणजे एकटं वाटायचं
. थांबेल ? आपण जिवंत असेपर्यंत हा एकटेपणा जाणार नाही. या बाबतीत काही ना काही करण्याच्या प्रयत्नात असेपर्यंत हा एकटेपणा जाणार नाही. म्हणजे कधीच जाणार नाही. फक्त काही क्षण हा एकटेपणा विसरल्यासारखं वाटू शकेल -- एकमताच्या गुंगीत --

समीरः आपली दोन वेगवेगळी शरीरं नको होती -- आपली दोन वेगवेगळी मनं नको होती --

सुधाः पण एकच शरीर आणि एकच मन असे आहोतच की आपण वेगवेगळे ! खरं तर आपल्याला एकही शरीर नको होतं आणि एकही मन नको होतं ! हे काहीच नसतं म्हणजे कोणताच प्रश्न आला नसता !

समीरः आपल्या मृत्यूनंतर तसं होईल --

सुधाः पण आपल्याला कळणार नाही ते ! काहीच नसून शिवाय आपल्याला कळायला हवं होतं --

समीरः काही नसल्यावर कळलं तरी आत्ता कळतंय त्या पध्दतीनं कसं कळेल ? वेगळंच असेल ते काहीतरी --

सुधाः आत्ता आहे असं राहून वेगळं होता यायला हवंय --

समीरः म्हणजे काहीतरी अशक्य ते घडावंसं वाटतंय तुला --

सुधाः एकाच ठिकाणच्या निश्चित गतीत अडकलोय आपण -- हा वेग आहे तिथंच राहतो आणि असह्य होत जातो --

समीरः एकाच ठिकाणची नसलेली गती हवीय तुला ?

सुधाः मला कळतंय, शक्य नाहीय ते -- मनाचं काम चालू आहे तोपर्यंत तरी शक्य नाही --

समीरः म्हणूनच मी म्हणतोय की मृत्यूशिवाय दुसरं कोणतंच उत्तर नाही याला -- मृत्यू न होता शांतता कशी

असूं शकेल ? मृत्यू न होता एकाच ठिकाणची गती कशी थांबेल ? मृत्यू न होता आपला एकटेपणा कसा जाईल ? मृत्यू न होता वेदना कशी जाईल ?

सुधाः मृत्यूत आपला संबंध संपण्याची भीती वाटते मला -- त्यापेक्षा सहन करू आपण -- टिकायला हवंय हे सगळं -- हे टिकवण्यासाठी कोणत्याही अग्निदिव्यातून जावं लागलं -- काहीही, कितीही सहन करावं लागलं तरी चालेल --

समीरः एखाद्या भव्य मंडपात लग्नसोहळा चालू असल्यासारखा वेदनेचा उत्सव माजवायचाय तुला --

सुधाः हो उत्सवच -- एक असह्य उत्सव --

समीरः काहीच नसण्याचे तपशील हवेयत मला.

सुधाः मी तिऱ्हाईत नाही.

समीरः शरीराच्या मर्यादेबाहेरच्या जगात जगायचंय मला.

सुधा : म्हणजे मी कुणीच लागणार नाही तुझी.

समीरः एकमेकांवरचे आपले हक्क सोडून देता येतील आपल्याला ?

सुधाः माझ्या संपूर्ण जीवनाचा उपभोग एका क्षणात घेऊन टाक.

समीरः राग कुणाला येतो ? दुःख कुणाला होतं ? मी म्हणजे कोण आहे ? माझं काय काय होऊ शकेल ? दुसऱ्याच एखाद्या शरीरात आत्ता आहे तोच मी असू शकलो असतो का ?

सुधाः मला अशी शंका येतेय की दुःखाचा कंटाळा येतोय तुला.

समीरः वारे वाहतील तशी पाठ किती वेळा फिरवणार ?.

सुधाः कदाचित तू माझ्यापेक्षा कमी हळवा असशील.

समीरः फुलांचे ताटवे फुललेले कुणीतरी बघायला हवेत.

सुधाः जे मी बोलायला हवं ते तू बोलतोयस.

समीरः मी तुला ओळखायचा प्रयत्न करतोय की मला ?

सुधाः म्हणजे जवळजवळ आपला सगळाच भूतकाळ नाकारायचाय का तुला ? काहीच नकोय ?

समीरः माझी नखं काहीतरी ओरबाडू पाहतायत.

सुधाः मला भोवळ येईल.

समीरः हद्द झाली !

सुधाः मीठ !

समीरः शिक्के आणि सह्या !

सुधाः अत्तर, गजरे, लिपस्टिक आणि आरसे.

समीरः बेलिफ. आणि हो. कॅज्युअल लीव्ह.

सुधाः नुसते उलटेसुलटे वाडे.

समीरः उन्हात सापडलेला रूपया.

सुधाः मेल्या माशा भंडावून सोडतात अगदी.

समीरः कुणाला तरी सांगून जा पण.

सुधाः ते तर कधीच वारले.

समीरः चहात साखर घालायची विसरलीस !

सुधाः ए, जाऊ दे ना रे, किती वाद घालशील --

समीरः बोअर केलं असतंन त्यानं -- म्हणून चुकवलं --

सुधाः माझ्याशी बोलाना तरी आडपडदा ठेवू नकोस.

समीरः ती चिठ्ठी सापडलीच नाही शेवटी.

सुधाः सगळे मेले येऊन जाऊन सारखेच.

समीरः एवढी वळणं वळणं कशाला -- स्पष्टच बोल नं !

सुधाः रिसीव्ह करायला कुणीच आलं नव्हतं आणि पत्ताही नव्हता माझ्याकडे.

समीरः आपल्याला सगळं नीट लागतं !

सुधाः तिच्या घरचे लोक ! नाव काढू नकोस त्यांचं !

समीरः मजा आली पण !

| | |
|---|---|
| सुधाः | आजच्या पेपरात आलंय अरे ते ! |
| समीरः | मोठ्यांची मेहरनजर म्हणतात ती ही ! |
| सुधाः | अष्टमीच्या दिवशी वारणं चांगलं असतं का रे ? |
| समीरः | माणूस नुसतं खचाखच भरलं होतं ! |
| सुधाः | अय्या ! त्यात काय ! आत्ता करते मी सैपाक. |
| समीरः | एकदा कबूल केलं म्हणजे झालं -- शब्द म्हणजे शब्द ! |
| सुधाः | कोड्यात बोलल्यासारखं बोलू नकोस. काही अंगाशी येण्यासारखं घडलंय का तुझ्या हातून ? |
| समीरः | सफरचंदांचा मोसम आहे का गं सध्या ? |
| सुधाः | वा रे वा ! हे बरंय ! |
| समीरः | ए, इकडे बघ नं -- |
| सुधाः | आमच्या काकांनी लुबाडलं अगदी माझ्या वडिलांना. |
| समीरः | आले होते का मग -- तुमचे थोरले बंधू ? |
| सुधाः | असे नाचलो आम्ही -- काही विचारू नकोस -- |
| समीरः | उद्याचं उद्या -- आत्ताचं बोल ! |
| सुधाः | नको रे -- |
| समीरः | एकदाच -- |
| सुधाः | तू ऐकणार नाहीस -- |
| समीरः | मनापासून असलं तर बोल -- |
| सुधाः | ( एकदम बांध फुटतो -- हुंदके देऊ लागते -- ) ... नाही सहन होत मला आता...असं का व्हावं आपलं ...असं का व्हावं...( हुंदके देत राहते...) |
| समीरः | ( जवळ येऊन, तिच्या पाठीवर हात ठेवून ...) सुधा, हे काय वेड्यासारखं -- अं -- असा निरोप घ्यायचा आपण एकमेकांचा ? ए -- हे बघ -- |
| सुधाः | ( रडतच ) काही सांगू नकोस मला -- काही नको -- हळूहळू बारीक होत जाईन मी -- आजारी पडेन -- का होतंय हे सगळं असं ? -- काय वाईट केलं होतं मी कुणाचं ... |
| समीरः | सुधा, थांबणार आहेस की नाही तू ? अं ? या शेवटच्या भेटीत ऐकणार नं माझं ? अं ? |
| सुधाः | हो. ( सावरायचा प्रयत्न करते --) हो. ( डोळे पुसते.) हो. ऐकायलाच हवं मला... ( पुन्हा डोळे पुसते.)काही नाही. मन कमकुवत झालं एकदम. तोलच गेला माझा. पण आता नाही. |
| समीरः | माझीही तुझ्यासारखीच अवस्था आहे सुधा -- फक्त मला रडू येत नाहीय -- उपयोग काय रडून ? आपण दुःखी होऊ नये म्हणून कोण करणार आहे स्वतःच्या मतांचा त्यांग ? काही उपयोग नाही. याही पध्दतीनं आपल्याला जगणं मुश्किल आहे आणि त्याही. आपण निर्लज्ज, दगड असायला हवे होतो. नुसते स्वार्थी असायला हवे होतो. आपलं तेच खरं आणि दुसऱ्यांची पर्वा नाही असं जगणारे असायला हवे होतो. आपल्याला दुसऱ्यांचाही नाश सहन होत नाही आणि स्वतःचाही. आपण कमकुवत आहोत. जगायलाच नालायक आहोत. हालहाल होऊन मरायच्या लायकीचे आहोत आपण. |
| सुधाः | जाऊ दे ! काही बोलू नकोस उगीच...जाऊ दे... |
| समीरः | गेलेला काळ...हे आताचे क्षण...येणारा काळ... हे सगळं खोटं तर नसेल सुधा ?( हसून) समज सगळी मानवजात संपूर्ण नष्ट झाली तर म्हणजे कधी कुठं काही घडलचं नाही असंच असणार नं सगळं ? म्हणजे मुळात तेच आहे. म्हणजे काहीच नाही. |
| सुधाः | जाऊ दे -- आता काही विचार करू नकोस -- काहीच समजत नाही त्यातून -- नुसतीच धडपड होते -- ( त्याच्या केसांतून हात फिरवीत) जेवलास की नाही आज ? |
| समीरः | हं -- |
| सुधाः | ' हं ' नाही. खरं सांग. |
| समीरः | जेवणाचं काही नाही गं एवढं ! |
| सुधाः | चल, आपण काहीतरी खाऊ ! अं ! |
| समीरः | नको.( काही क्षण जातात.) |
| सुधाः | तुझ्या घरच्यांना माहिती आहे -- तू मला भेटायला आलायस ते ? |

समीरः नाही.

सुधाः मी सांगून आलेय. एकदा शेवटचं भेटणारच म्हटलं. मला त्याची सुध्दा काळजी घ्यावी लागेल, समजूत घालावी लागेल असं सांगितलं. आई तर रडतच होती. तिला वाटलं की आपण शेवटचं म्हणून भेटणार आणि मरणार.

समीरः माझा तर हाच विचार होता. सगळ्यांना पस्तावायला लावायला हेच करायला हवंय. आपला पराभव आणि त्यांचा विजय असं जगण्यापेक्षा सगळ्यांचा पराभव व्हायला पाहिजे -- त्यांचाच का म्हणून विजय ?

सुधाः अशी जर खरोखर आपली तयारी असती तर आपलाच विजय नसता का करून घेता आला ? दुसऱ्यांचा नाश टाळायची जबाबदारी घेणारी मूर्ख मनं आहेत ना आपली ! आणि मला तर त्यांचीही दया येते रे ! काय करणार ते ? असेच घडलेत ते ! दुसरं कसं जगतील ? या सगळ्या अटळ गोष्टी म्हणूनच धरून चालावं लागेल.

समीरः ( सुस्कारा टाकतो. बसतो.) किती वाजले ? ( घड्याळात पाहतो --)

सुधाः थांबू अजून जरा वेळ. ( तीही बसते. काही क्षण जातात.)

समीरः समज मला आता जगण्यात काहीच चार्म राहिला नाही आणि मी --

सुधाः नाही, असं नाही करायचं. या बाबतीत तुला माझं ऐकावं लागेल. असं काही केलंस तर तू मनानं मला टाकून दिलंस असं वाटेल मला.( काही क्षण जातात.) लग्न कर.

समीरः ( काही क्षण तिच्याकडे पाहून --) तुझं काय ?

सुधाः माझं नाही सांगता येत -- माझा स्वभाव हळवा आहे -- दुसऱ्या कुणाचं आयुष्य जाळण्यात काय अर्थ आहे ? तुझ्या स्वभावानं तुला शक्य झालं तर कर असं म्हणतेय मी. मला वाईट वाटणार नाही. तू मला विसरू शकलास तरी माझी हरकत नाही. मी वाईट वाटून घेणार नाही.

समीरः म्हणजे आता आपल्या आपल्यातही कुणाचा त्याग जास्त होईल हे पाह्यचं का आपण --?

सुधाः असा फरक समजायचाच नाही आपण -- आपण एकमेकांच्या आयुष्यांतून लांब जात असलो तरी विश्वास कायम ठेवायचे आपण--

समीरः एकदा एका शहरात एक ब्राह्मण कुटुंब राहात होतं -- पतीपत्नी दोघंही नोकरी करायचे --

सुधाः प्लीऽज -- दुसऱ्यांच्या कहाण्या नकोत यावेळी -- मला तर सारखा तुझ्या यानंतरच्या काळालाच स्पर्श करत राहावंसं वाटतंय --

समीरः आणि मी काय करू शकणार आहे ? माझं तू ऐकू शकणार नाहीस -- कारण तुझा स्वभाव हळवा आहे--

सुधाः आपण जसे आहोत तसेच तर प्रेमात पडलो एकमेकांच्या ! आता तुलना, फरक, देवाणघेवाण यांचा काय प्रश्न आहे ?

समीरः मग माझ्या तर डोक्यात काही विचार येतायत --

सुधाः काय ?

समीरः आणखी काही वेळ थांबू आपण -- पूर्ण मीलनोत्सव करू आणि मग जाऊ--

सुधाः आपली मनःस्थिती आहे का तशी ? आणि जी गोष्टी जशी सहन करावी आपण अशी इतरांची इच्छा आहे -- की ज्यामुळंच हे सगळं घडतंय -- त्यात बदल कशाला करायचा ? पण ही आपली शेवटची भेट आहे -- मी नाही म्हणणार नाही -- मला काय वाटत असेल याचा विचार करून तूच ठरव काय ते -- आपण त्यांची फसवणूक केली तर दुःख शुध्द राहणार नाही आपलं --दुःख शुध्द ठेवण्यासाठी एका धारेवरच चालावं लागेल --

समीरः हे फक्त विचारांचे खेळ आहेत -- दुसऱ्या कुणीतरी दिलेलं दुःख आपण जसंच्या तसं का घ्यावं -- त्यांच्यावरही थोडीतरी मात करावी असं वाटलं मला -- पण जाऊ दे -- ते काही इतकं महत्त्वाचं नाही आता -- आणि आतापर्यंत इतकं हे असं वागून शेवटच्या क्षणी वेगळंच काहीतरी वागण्यातही अर्थ नाही -- आपणहून स्वीकारलेल्या भूमिकेतच राहू आता --

सुधाः हाच क्षण आणखी काही वर्षं लांबू शकणार नाही --

समीरः बरंचसं बोलून झालंय आपलं -- आता बहुतेक निरोपाचीच दोन वाक्यं शिल्लक असतील --

सुधाः पूर्ण बोलून झालं असं वाटूच शकणार नाही आपल्याला --

समीरः या शेवटच्या भेटीसाठी विश्वास टाकला त्यांनी तुझ्यावर हे विशेषच आहे.

सुधाः विश्वास टाकणं भागच पाडलं मी त्यांना --

समीरः मी तुला एक भेटवस्तू दिली तर जपून ठेवशील ?

सुधाः अशी कुठलीही वस्तू ते घरात ठेवू देणार नाहीत -- पण माझ्या मनातल्या गोष्टी तर ते टाकून नाही देऊ शकणार --

समीरः हं --

सुधाः आपल्या प्रेमाच्या आठवणी या सर्वात मौल्यवान वस्तू असतील माझ्याजवळ --

समीरः उच्चाटन झालंय --

सुधाः गोळीबार झालाच नाही --

समीरः खिसे फाटलेत --

सुधाः तुझी इच्छा --

समीरः पण तू सांग --

सुधाः माझं काय ?

समीरः उपयोग होईल.

सुधाः वेडेवाकडे संदर्भ नुसते.

समीरः नऊ बाराची डबलफास्ट.

सुधाः काय करणार ?

समीरः असं अर्धवट नको.

सुधाः आता माझी पाळी.

समीरः नको.

सुधाः का ?

समीरः कशामुळं ?

सुधाः वाट्टेल ते होऊ दे !

समीरः उद्याचा सूर्य --

सुधाः माझ्या पाठीतनं कळ येतीय --

समीरः ( ओरडतो ) गोऽल ! ( टाळ्या वाजवतो. )

सुधाः कांद्याची भाजी होती --

समीरः नाटक नुसतं --

सुधाः कोण ?

समीरः व्हाईट ब्लॅक सिक्स्टी फॉर्टी.

सुधाः हजर झाल्यावर पाहते मी.

समीरः तर ही झाली गोष्ट गणेशकाकांची !

सुधाः त्यांच्या अस्थिर, अनिश्चित कारकीर्दीची !

समीरः वाट लागली --

सुधाः ( हसून --) वा रे तुझी बंडल !

समीरः हलकट आहे तो --

सुधाः माझा मलाच पश्चात्ताप झाला --

समीरः माझ्या बहुउद्देशीय उद्योगाचं एतद्देशीय प्रामाणिक प्रणालीत रूपांतर झालं तेव्हा मी अवघा आठ वर्षांचा होतो. निसर्गाचं वेड तसं मला लहानपणापासूनच नव्हतं. मला फारशी झाडं, पानं ओळखता येत नाहीत. फुलं म्हणाल तर फक्त गुलाब, शेवंती, गुलमोहर आणि कर्दळी. आणखी एखाद दुसरं असेल, पण आठवत नाही. पण डेलिया म्हटलं किंवा नर्गिस म्हटलं की संपलं. मला काही कळत नाही. हं, कमळ एक माहीत आहे. तर अशा पध्दतीनं वाढत्या वयाबरोबर मला जगाचा नकाशा माहीत होत गेला. पण परदेश प्रवास असा काही घडला नाही. पण ज्यांना घडलाय त्यांच्याबद्दल मला आदर वाटतो. पण निसर्गप्रेमी लोकांच्याबद्दल असं काही नाही. त्यांच्याबद्दल मला खास असं काही वाटत नाही. मी त्यात इंटरेस्ट घेतलं असतं तर मलाही ते कळलं असतं. बुध्दीची कमतरता नाहीय. आणि शेवटी कितीही म्हटलं तरी एका मेंदूत मावणार किती यालाही मर्यादा आहेच. अनावश्यक भरताड करायचंय काय ! तर

यावर माझा एक मित्र म्हणतो की अशा स्वभावामुळं बऱ्याच गोष्टींच्या आनंदाला मी मुकतो. तो म्हणतो की तुला दरबारी कानडा माहिती नाही तर जगून उपयोगच काय ? पण माझ्या क्षेत्रात मी तल्लख म्हणून ओळखला जातो. म्हणून मला सगळं माफ आहे असं माझं म्हणणं नाही. देशाचे कायदे आहेत ते सगळ्यांना पाळावे लागतीलच. शांतता आणि सुव्यवस्था राहिलीच पाहिजे. उगीचच दंगली उसळावायच्या, माणसं मारायची याला कुणी चांगलं म्हणणार नाही आणि लोकांना सर्वसाधारणपणे साधकबाधक, हित-अहित कळतं. बऱ्याचदा कळतं. काही काही वेळी कळतही नसेल किंवा बऱ्याच वेळी कळत नसेल. पण असा कुणीच नसतो की ज्याला सगळं माफ आहे. नुसता शक्तीचा प्रश्न नाही. शक्तीसुध्दा प्रत्येक वेळी वापरता येतेच असं नाही. माणुसकीचेही प्रश्न असतात. शक्ती असून एखादा मनुष्य आयुष्यभर माणुसकीच्या प्रश्नांनी घेरला गेला आणि त्यामुळं शक्ती वापरलीच गेली नाही असं होणं शक्य आहे. मग त्याच्याकडे शक्ती होती म्हणायचं की नव्हती म्हणायचं ? खास आवड अशी म्हणाल तर व्हॉलीबॉल आणि कॅरम. कॉलेजमध्ये असताना कॅरम चॅम्पियन होतो मी -- अर्थात त्यामुळं मी काही फारसा महत्त्वाचा ठरतो असं मला मुळीच म्हणायचं नाही --

सुधाः माझी परिस्थिती तुझ्यासारखीच आहे की नेमकी उलट आहे ते नाही मला सांगता येणार पण जवळजवळ सारखंच आहे. फरक असतील थोडेसेच किंवा फार तर जरा जास्तच असतील. मी अगदी लहान असतानाची एक घटना सांगतात. माझी आजी मला सांभाळत बसली असताना तिच्या हातून मी एकदम निसटले आणि पडले. कपाळाला खोक पडली. रक्त आलं. तर मला तिच्याजवळ कशाला दिलं म्हणून ती इतकी संतापली की बेशुध्दच पडली. मग तिला कुणी काही बोललं नाही. आपली चूक तिला इतकी मनाला लागलीय की कुणी त्याची वाच्यता करू नये म्हणून ती इतकी संतापलीय असं आम्ही समजून घेतलं असं वडील म्हणतात. तसंही असेल, किंवा आता आणखीन तिच्या संतापाला चालना द्यायला नको म्हणूनही गप्प बसले असतील. ती खूण अजून आहे माझ्या कपाळावर. दुसरं एक मला आठवणारं म्हणजे माझी बालमैत्रीण मेघना. हल्ली ती एका कुष्ठरोग्यांच्या वसाहतीत काम करते. काय तिला अचानक या कामाचं आकर्षण वाटलं काही कळत नाही. पण विशेष म्हणजे ती भेटली तेव्हा मात्र मी तिला हा प्रश्न विचारला नाही. आम्ही दुसरंच काही बोलण्यात रंगून गेल्यामुळं असेल किंवा हा प्रश्न तिला विचारावा असं वाटलंच नसेल मला त्यावेळी. नाही, मला वाटतं मी विचारलं होतं तिला. पण तिनं काय उत्तर दिलं ते आता मला आठवत नाहीय. त्यामुळं मी विचारलंच नसेल असं मला वाटत असेल. ती काळ्यापांढऱ्या चौकानांची कोडी असतात नं -- उभ्याआडव्या शब्दांची -- ती एक सोडवायला आवडायचं मला. त्यामुळं माणसाला योग्य वेळी योग्य तो शब्द आठवायची सवय लागते. शब्दांवरच तर बरंचसं अवलंबून असतं आयुष्यातलं. भल्याभल्यांना आठवायचे नाहीत ते शब्द मला आठवायचे. त्यामुळं कवितांचे अर्थही मला चांगले कळायचे. माझ्या सगळ्या मैत्रिणींत आणि नातेवाईकांत कवितांची पुस्तकं वाचणारी मी एकटीच होते. लोकांना असं वाटतं की कविता म्हणजे पैसे मिळवायच्या कामात अडथळे

. आणणारी वस्तू. किंवा कवितेचा उपयोग असा दिसून येत नाही ना ! त्यामुळं असेल. पण कविता वाचल्या म्हणजे वेळ फुकट गेला असं मला तरी वाटत नाही. आपल्याला आनंद वाटला, आपल्याला माणसाच्या मनाच्या सूक्ष्म गोष्टी कळल्या, त्यामुळं आपली समज वाढली असंच मला वाटतं आणि या गोष्टी नकोयत का माणसाच्या आयुष्यात ? अर्थात् त्यामुळं फार काही फरक पडत नाही म्हणा --

समीरः आपल्याला विचार करायला आवडतं, विचारांचे खेळ करायला आवडतं, विचारांचे धागेदोरे पाहायला आवडतात आणि विचारांनीच सगळं काही कवेत घ्यायचा प्रयत्न करायला आवडतं -- या समान आवडीमुळं खरं तर आपल्याला एकमेकांचं आकर्षण वाटलं आणि आपण प्रेमात पडलो -- पण आता तर निश्चितपणे लक्षात येतंय की विचारांचा काहीच उपयोग नाही -- म्हणजे आपल्या प्रेमाचा मूळ पायाच निरर्थक होता की काय ?

सुधाः ते कारण होतं पण एकदा प्रेमात पडल्यावर मग तेवढंच कारण राहिलं असं मला वाटत नाही.

समीरः पण विचारांना महत्त्व देणारे आहोत की नाही आपण ? म्हणजे मुळातच सगळा चुकलेला आवाका होता का हा आयुष्याचा ?

सुधाः विचारांशिवाय समजून घ्यायची काय पध्दत असणार आहे ?

समीरः विचारांनी काय समजतं पण ? निर्णय घ्यायला विचारांचा काय उपयोग होतो ? वेदनाहीन व्हायला विचारांचा काय उपयोग होतो ? बरोबर वागायला काय उपयोग होतो विचारांचा ? विचार हे नेहमी

आपली कृती ही आपल्या अर्धवट, गोंधळलेल्या व्यक्तिमत्वांच्या मर्यादेत ठेवतात -- म्हणून विचार म्हणजे नुसता गोंधळ असतो असं वाटतंय मला --

सुधाः येतेय नं अशी शंका. थांबव मग विचार --

समीरः आता विचार थांबले पाहिजेत हा जेव्हा एक विचार असणार नाही तेव्हाच विचार थांबेल ना पण !

सुधाः म्हणजे थांबू शकणार नाही.

समीरः आपण फरफटत जगत आलो आणि असेच जगत राहू जेवढे जगू तेवढे !

सुधाः चुकीचं किंवा गोंधळलेलं का असेना, काही ना काही वागता येण्यासाठी साधन आहे कुठलं दुसरं !?

समीरः विचारांनी वाटोळं होतं. विचारांनी तोंड नाही देता येत आयुष्यातल्या एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नाला.

सुधाः थकलेल्या अवस्थेतसुध्दा विचारांवरचा विश्वास उडू शकतो -- कारण विचारही नीट करू शकत नसतो आपण त्यावेळी --

समीरः मग योग्य विचारांसाठी जास्तीत जास्त आवश्यक शक्तीचं प्रमाण काय आहे ? तसं असतं का कधी ?

सुधाः मीही थकलेय --

समीरः आपलं काही खरं नाही --

सुधाः आपलं दुःख खरं आहे -- वेदना खरी आहे --

समीरः निसर्गानं जगण्याची योग्य साधनं आपल्याला दिलेली नाहीत --

सुधाः हे खरं असेल तर तशी साधनं कुणाकडेच नाहीत --

समीरः नसतीलच बहुतेक.

सुधाः नसूं देत !

समीरः हं --

सुधाः एक सांगू ?( तो पाहतो --) आपण अगदी हळुवार, साधं काहीतरी बोलूया. स्वप्नील बोलू या. खोटं बोलू या म्हण हवं तर --

समीरः काही उपयोग नाही आता --

सुधाः असं नको म्हणूस -- ताटातुटीच्या भावनेत परत जायचंय का आपल्याला ?

समीरः नाहीतर कसल्या मग ?

सुधाः असं नको म्हणूस - वेळ थोडा आहे --

समीरः ठीक आहे --

सुधाः अरे ठीक काय आहे ? -- असं नको का करूस --

समीरः ठीक आहे -- मला तुझ्या मोहरलेल्या मनाचा स्पर्श दे -- तुझ्या डोळ्यांतलं तरंगतं स्मित दे -- तुझ्या हातांची ऊबदार साद दे --आणि--आणि तुझ्यातल्या स्त्रीत्वाची संपूर्ण समर्पणशक्ती एकवटून जवळ ये --(ती पाहतेय --) आपण शेवटचं चुंबन घेऊ --( ती पाहतेय --) एखाद्या फुलाची पाकळी हो -- एखाद्या उसळलेल्या कारंज्याची धार हो -- पर्जन्याच्या प्रतीक्षेतली धरणी हो -- सर्वस्वाचा नाश करणारी ज्वाला हो -- संपूर्ण आकाशाला दुभंगवून टाकणारी वीज हो -- आणि ये जवळ --( ती त्याच्याकडे स्वप्नातल्या प्रमाणे पाहात जवळ येऊ लागते --) तुझ्यामाझ्यातला हा शेवटचा उत्सव -- तुझ्यामाझ्यातला हा शेवटचा क्षितिजव्यापी क्षण -- एखाद्या मुसळधार पावसासारखा साजरा करू या --( तो, तिला मिठीत घेण्यासाठी हात उघडून उभा राहतो--) ये--( ती जवळ येते --तशीच भ्रमिष्टासारखी पाहात -- तो तसाच उभा -- )

सुधाः आलेय मी -- ( तो तसाच उभा --) आलेय मी समीर --

समीरः ( त्याच्या नजरेत बदल -- एकदम भावविवश होत...) तू परकी झालीयस सुधा...(ओक्साबोक्शी रडत -- )
. परकी झालीयस...( खाली बसतो... हुंदके देतो...)

सुधाः समीर...( आता तीही भावविवश होत जाते...) समीर...मी ... परकी ?...( तीही खाली बसते...त्याचा हात हातात घेते...दोघेही केविलवाणे होऊन रडत राहतात...)

. ...पडदा पडत जातो...

. **सूचना : सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.**

पत्ता - चं.प्र.देशपांडे,

३, स्नेहदीप अपा., चिंतामणीनगर, सहकारनगर नं.२, पर्वती, पुणे - ४११ ००९.

**दूरध्वनी - ४२२ ७८४७.**